# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दि.३१ ऑक्टोबर, २०२०

(कृपया, आपल्या दैनिकाच्या जळगाव,धुळे व नंदूरबार आवृत्तीतून बातमी प्रसिध्द करावी, ही विनंती.)

जळगाव दि.३१ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या अंतिम वर्ष/अंतिम सत्र (बॅकलॉगसह) परीक्षेच्या तेराव्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत पहिल्या सत्राात ९७ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा दिली. सायंकाळी उशिरापर्यंत परीक्षा सुरु होत्या.

उन्हाळी २०२० मधील अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या बॅकलॉगसह परीक्षा १२ ऑक्टोबर पासून सूरू झाल्या आहेत. या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने घेतल्या जात आहेत. मंगळवारी परीक्षेचा बारावा दिवस होता. दुपारपर्यंत विविध विद्याशाखांच्या २५ विषयांच्या परीक्षा झाल्या. सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत झालेल्या परीक्षांच्या विविध सत्रात १ हजार ५२९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा यशस्वीपणे दिली तर १ हजार ८७० विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली. सायंकाळी उशिरापर्यंत परीक्षा सुरु होती. अशी माहिती परीक्षा व मुल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी दिली.

---

आपला विश्वासू

(डॉ.सुनिल पाटील)
जनसंपर्क अधिकारी